# आदर्शचे 'श्रीगणेशा' प्रेक्षकांच्या भेटीला

आपल्या जबरदस्त आवाजाने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य करणारा सुप्रसिद्ध गायक आदर्श शिंदेचे 'श्रीगणेशा देवा श्रीगणेशा...' हे गाणे प्रेक्षकांच्या भेटीला आले आहे. आदर्श शिंदे यांच्या जल्लोषमय आवाजातील या गाण्याला ओंकार घाडी यांचे शब्द लाभले असून अल्ट्रा मीडिया अ‍ॅण्ड एन्टरटेन्मेंट प्रा. लि. यांनी हे गीत प्रदर्शीत केले आहे. ढोल ताशांचा गजर ... गुलालाची उधळण.. बाप्पाचा जयघोष... असे गणेशोत्सवातील भारावून जाणारे वातावरण या गाण्यात पाहायला मिळत आहे. बाप्पाविषयीची भाविकांची आत्मीयता या भावपूर्ण गाण्यातून व्यक्त होत आहे. या गाण्याबद्दल गायक आदर्श शिंदे म्हणला की, बाप्पाचे गाणं गायला मला नेहमीच आवडतं. भक्तिमय गाणी गाण्यात एक वेगळाच आनंद मिळतो. श्रीगणेशा हे गाणंही असंच स्फूर्तिदायी गाणं आहे.

